सन २०१८-१९ करीता विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत प्राप्त निधी वितरणास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः केंद्रिय-२०१८/प्र.क्र.६९/का.-१९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

तारीख: २०/०३/२०१९

वाचा -

१. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.No.११०१५/३/२०१८-Grants, दि.२१/१२/२०१८.

२. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/४(१३)/२०१८-Grants, दि.१८/०१/२०१९.

३. आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रिय-२०१८/प्र.क्र.६९/का.-१९,दि.०५.०३.२०१९

४. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/४(१३)/२०१८-Grants, दि.२८/०२/२०१९.

प्रस्तावना (Preamble) -

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) व विशेष केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत अतिरिक्त प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्रकल्प मुल्यमापन समितीची (Project Appraisal Committee-PAC) बैठक दि. १७/१२/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीच्या वाचा क्र. १ वरील इतिवृत्तान्वये केंद्र शासनाने विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत एकुण रु. २३००.४० लक्ष निधीच्या प्रस्तावांना मान्यता प्रदान करून वाचा क्र.२ वरील पत्रान्वये मंजूर निधीच्या ८०% च्या प्रमाणात रू.१८४०.३२ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला होता. सदर निधी वाचा क्र.३ वरील शासन निर्णयान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना वितरीत करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाकडून वाचा क्र.४ वरील पत्रान्वये उर्वरित २०% निधी रू.४६०.०८ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे .सबब, केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला रू.४६०.०८ लक्ष इतका निधी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय (Government resolution)-

केंद्र शासनाने सन २०१८-१९ करिता विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत मंजूर केलेल्या अतिरिक्त एकूण रु. २३००.४० लक्ष (रु.तेवीस कोटी चाळीस हजार फक्त) निधीमधून पुढील कामांकरीता रू. ४६०.०८ लक्ष (रु. चार कोटी साठ लक्ष आठ हजार फक्त) खर्च करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	योजनेचे ठिकाण / योजना राबविणारी यंत्रणा (PO/ATC/संस्था)	सन २०१८-१९ करीता मंजूर अतिरिक्त निधी (रु.लाखात)	वितरीत करण्यात आलेला निधी (रु.लाखात)	वितरीत करण्यात येणारा निधी (रु.लाखात)
१	२	३	४	५	६
१	Furniture in 19 Ashram Schools Per Unit items: a) Metal Bunk Bed-2 b) Mattress for Beds-1 c) Desk Cum Bench -2 d) Mess Table with stools-6 e) Training Room Chair Unwind Chair with Desklet-1 f) Sliding Shutter Storage/Almira-2	Commissionerate	२३००.४०	१८४०.३२	४६०.०८
	Total		**२३००.४०**	**१८४०.३२**	**४६०.०८**

२. उपरोक्त रू. ४६०.०८ लक्ष (रु. चार कोटी साठ लक्ष आठ हजार फक्त) खर्च मागणी क्र. टी-५, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागसवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, (०२) (४३) ,विशेष केंद्रिय सहाय्य अन्वये केंद्रीय सहाय्य (केंद्र योजना), ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) (२२२५ E०४२) यामधील सन २०१८-१९ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीतून करण्यात यावा.

३. सदर निधी अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत आहे. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी वितरीत निधीच्या मर्यादेत निधी तातडीने आहरीत व वितरित करण्याची दक्षता घ्यावी

४. केंद्र शासनाकडुन मंजुर सर्व योजनांचा मासिक प्रगती अहवाल संबंधित अपर आयुक्त/प्रकल्प अधिकारी यांच्याकडुन प्राप्त करुन घेवुन दरमहा १० तारखेच्या आत शासनास सादर करणे व कार्यान्वित असलेल्या योजनांसंदर्भात पुढील निधी संबंधितांना वितरित करण्यापुर्वी त्या योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल व झालेल्या खर्चाबाबत उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी आयुक्त,आदिवासी विकास , नाशिक यांची राहील.

५. ज्या योजना संबंधित प्रकल्प अधिका-यांच्या कार्यक्षेत्रात राबविल्या जातील त्या योजनांच्या लाभार्थ्यांची यादी व Geotagged Photographs हे www.stcmis.gov.in /smis या वेबसाईट वर अपलोड करावेत. प्रकल्प राबविल्याबाबतचा आवश्यक दस्ताऐवज संबंधित प्रकल्प अधिका-यांमार्फत ठेवण्यात येवून तो योग्य प्रकारे जतन केला जाईल याची दक्षता संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडून घेण्यात यावी व योजनांची कालबद्ध अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी संबंधित अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची राहील.

६. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेले अनुदान ज्या बाबींसाठी खर्च करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे, त्याच बाबींसाठी खर्च करावे व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२२/अर्थोपाय, दिनांक ११/०३/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१३४२५७९१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.03.20 13:53:03 +05'30'

(संतोष जाधव)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१) मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
५) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे
६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८) सहसचिव /उपसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
९) अपर आयुक्त,आदिवासी विकास,ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.
१०) अवर सचिव, भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२) सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१३) नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अवर सचिव, का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.